: संस्थापक संपादक :
स्व. भगवानप्रसाद त्रिपाठी,
स्व. अशोक कुमार त्रिपाठी
- - - - - - - - - - - - - -
- : संपादक :-
निरज त्रिपाठी

# जन-संग्राम

: E-mail :
janwardha@gmail.com
R.N.I. No.
9157/57
Postal No.
WRD/114/2024-2026
http://jansangram.com

वर्ष : ६९ अंक नं.२४८ दैनिक वर्धा, सोमवार दि.१९ ऑक्टोंबर २०२६ मुल्य : १.०० रु. पृष्ठ : ४

## इंद्रप्रस्थ महाविद्यालयात २२ ऑक्टोबरला रंगणार संशोधन क्षेत्रातील महाकुंभ




**प्रतिनिधी/दै.जन-संग्राम**

**वर्धा :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला आणि कल्पकतेला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणाऱ्या आविष्कार संशोधन महोत्सव २०२६-२७ चा बिगुल वाजला आहे. वर्धा जिल्हास्तरीय निवड चाचणी यावर्षी नालवाडी येथील इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा च्या यजमानपदात २२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे अशी अधिकृत घोषणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

भारताला तंत्रज्ञान आणि संशोधनात स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात पदवी (UG) पदव्युत्तर (PG) आणि पीएच.डी. (PPG) अभ्यासक्रमाचे युवा संशोधक आपले नाविन्यपूर्ण शोधप्रबंध व मॉडेल सादर करणार आहेत. पदवी २५ आणि पदव्युत्तर गटातील विद्यार्थ्यांसाठी ३० वर्षांची वयोमर्यादा निर्धारित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त प्रतिभावंत विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पनांसह या महोत्सवात सहभागी होऊन वर्धा जिल्ह्याचा गौरव वाढवावा असे आवाहन प्राचार्य डॉ. आशिष ससनकर व कॉलेज प्रशासनाने केले आहे.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सहभाग नोंदवण्यासाठी इच्छुकांना १९ ऑक्टोबर २०२६ पूर्वी forms.gle - https://forms.gle/D7hFga84bE3vxGMu6 या अधिकृत डिजिटल लिंकवर ऑनलाईन अर्ज भरणे अनिवार्य आहे.

या महोत्सवांतर्गत देशाच्या विकासाला गती देणाऱ्या खालील ६ मुख्य क्षेत्रांमध्ये संशोधन प्रकल्प सादर केले जातील:

१. मानवविद्या भाषा व ललित कला - Humanities Arts
२. वाणिज्य व्यवस्थापन व कायदा - Commerce, Management Law
३. शुद्ध विज्ञान Pure Sciences
४. कृषी व पशुपालन - Agriculture Animal Husbandry
५. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान - AEngineering Technology
६. वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र - Medicine Pharmacy

अधिक माहिती व नाव नोंदणीच्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी प्रा. संदीप पेटारे (९९७०८६५१७६), डॉ. वैभवी उघडे (७०५८३३८९६२), डॉ. प्रमोद आचेगावे (९८६०४१४३७६), डॉ. ज्ञानेश्वर बोहरूपी (८८३००६७२५८), प्रा. प्रफुल अंभोरे (८८५६९००६५७) यांच्याशी संपर्क साधता येईल.

## ग्रामपंचायत निहाय पाणीटंचाईचे आराखडे तयार करून अंमलबजावणी करा- जिल्हाधिकारी वान्मथी सी



**प्रतिनिधी/दै.जन-संग्राम**

**वर्धा :** जिल्ह्यातील भूजलपातळी खालावत असल्याने आगामी काळात पाणीटंचाई व दुष्काळाची परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कारंजा, आर्वी व आष्टी तालुक्यांतील पाणीटंचाई व दुष्काळ निवारणासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून तातडीने उपाययोजना कराव्यात. ग्रामपंचायत निहाय पाणीटंचाईचे आराखडे तयार करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी दिले.

तहसिल कार्यालय आर्वी येथे कारंजा, आर्वी व आष्टी तालुक्यातील पाणी टंचाई व दुष्काळ निवारणार्थ उपाययोजना संबंधित आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सूरज गोहाड, उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, तहसीलदार हरीश काळे, ऐश्वर्या गिरी यांच्यासह गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भूजल पातळी खालावल्यामुळे विहिरींमधील पाणीसाठा कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा किती काळ पुरेल, याचे नियोजन प्रत्येक गावाने आतापासूनच करणे आवश्यक आहे. पुढील जून महिन्यापर्यंतची संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. केवळ नळदुरुस्तीची कामे पाणीटंचाई आराखड्यात समाविष्ट करण्याऐवजी विहिरींचे खोलीकरण, गाळ काढणे, आडवे बोअर घेणे आणि पाण्याचे नवीन स्रोत विकसित करणे यासारख्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वान्मथी यांनी दिल्या.

ग्रामसेवक, तलाठी आणि कृषी सहाय्यकांनी गावपातळीवरील परिस्थितीचा नियमित आढावा घेऊन उपलब्ध जलस्रोत, पाण्याची मागणी आणि संभाव्य टंचाई यांची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करावी. त्यानुसार उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी नागरिकांमध्ये आतापासूनच जनजागृती करावी. दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने जलयुक्त शिवार, वनराई बंधारे आणि चारा उपलब्धतेच्या नियोजनाला प्राधान्य देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. टिल्लू पंपांचा वापर, जलवाहिन्यांमधील गळती आणि पाण्याचा अनावश्यक उपसा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित विभागांनी ठोस कार्यवाही करावी. पाणीटंचाई व दुष्काळ निवारणासाठी उपलब्ध निधीचा योग्य विनियोग करून मंजूर कामे वेळेत पूर्ण करावीत. निधी उपलब्ध असूनही कामे प्रलंबित ठेवणे किंवा जबाबदारी टाळणे खपवून घेतले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

आर्वी, कारंजा व आष्टी तालुक्यात आगामी काळात दुष्काळाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षता घेता चारा लागवड तसेच वैरण विकास योजनेचे शेतकऱ्यांकडून अर्ज भरून घेऊन त्यांना योजनांचा लाभ मिळवून द्यावा. ग्रामपातळीवर आवश्यक कामे करण्यात टाळाटाळ किंवा दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. काही प्रशासकीय अडचण असल्यास निदर्शनास आणून देण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

**पाणी टंचाईचे दिर्घकालीन नियोजन करा: पराग सोमण**

पाणी टंचाईचे नियोजन करतांना दिर्घकालीन गावनिहाय नियोजन करा. ग्रामीण भागातील नागरिकांच्या मागणीनुसार व्हीबीजीरामजी योजनेची कामे तातडीने सुरू करा. शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी प्रोत्साहित करून जनजागृती करा. शासनस्तरावरून येणाऱ्या सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा. तालुकास्तरीय सर्व अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत निहाय भेटी देवून पाणी टंचाईची वस्तूस्थिती सादर करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी दिल्या.

## वादातून व्यक्तीवर हल्ला

**वर्धा :** क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात एका युवकाने व्यक्तीवर लाकडी दांडक्याने हल्ला केला. या हल्ल्यात संबंधित व्यक्ती जखमी झाली. ही घटना पुलफैल येथील वैकुंठधाम परिसरात घडली. याप्रकरणी सालोड (हिरापूर) येथील जखमी भोजराज शंकर पडोळे (४२) यांनी शहर पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी रिझवान शेख इस्माईल शेख याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू केला आहे.

## डॉ. प्रीती अदाणी यांच्या अध्यक्षतेखाली अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचा दीक्षान्त समारंभ; महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मानद डी.लिट. पदवी प्रदान




**प्रतिनिधी/दै.जन-संग्राम**

**वर्धा :** वर्धा येथील अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च या अभिमत विद्यापीठाच्या १७व्या दीक्षान्त समारंभात महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना मानद डॉक्टर ऑफ लेटर्स (डी.लिट.) पदवी प्रदान करण्यात आली. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीएमआयएचईआर) या पूर्वीच्या नावाऐवजी संस्थेचे नवीन नामकरण झाल्यानंतर आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच दीक्षान्त समारंभ होता. विद्यापीठाच्या कुलपती आणि अदाणी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदाणी यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडला.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांना वैद्यकीय शिक्षण, आरोग्यसेवा प्रशासन आणि भारतातील सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल मानद डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) पदवी (ऑनोरिस कॉसा) प्रदान करण्यात आली.

विद्यापीठाच्या दहा विद्याशाखांमधील एकूण २,३२० विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये १२३ पीएच.डी. पदव्यांचा समावेश आहे. शैक्षणिक गुणवत्तेसाठी १२३ सुवर्णपदके, सात रौप्यपदके आणि अन्य १३ पुरस्कार प्रदान करण्यात आले. हे पुरस्कार एकूण ८३ गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात आले. दत्ता मेघे मेडिकल कॉलेजच्या (डीएमएमसी) पूजल देवीदास मापारी हिला उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल तब्बल २३ पदके प्रदान करण्यात आली.

ज्या संस्थेतून तुम्ही पदवी प्राप्त केली, ती संस्था समाजाने निर्माण केली आहे. त्यामुळे समाजाला परतफेड करण्याची संधी प्रत्येकाने शोधली पाहिजे. तुम्ही किती पैसा कमावता, यावर यशाची व्याख्या ठरत नाही; तर तुम्ही समाजाला किती परत देऊ शकता, यावर तुमचे यश अवलंबून असते, असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावेळी हलक्याफुलक्या शैलीत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, इतक्या पीएच.डी. पदवीधारकांकडे पाहताना, ही पदवी मिळवण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत मला करावी लागली नाही, याबद्दल मी देवाचे आभार मानतो.

आजचा दिवस आमच्या विद्यापीठ परिवारासाठी अभिमानाचा आहे. विद्यार्थ्यांसाठी, त्यांच्या कुटुंबीयांसाठी आणि शिक्षकांसाठी हा अनेक वर्षांच्या कठोर परिश्रमांचा आणि समर्पणाचा परिपाक आहे. या प्रसंगी आम्ही स्वर्गीय श्री. दत्ता मेघे यांचेही स्मरण करतो. त्यांच्या दूरदृष्टीतून या संस्थेची उभारणी झाली आणि शिक्षण व आरोग्यसेवा क्षेत्रातील त्यांचे योगदान आजही संस्थेच्या वारशाचा अविभाज्य भाग आहे, असे विद्यापीठाच्या कुलपती आणि अदाणी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदाणी म्हणाल्या.

दहा विद्याशाखांमधून विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण : विद्यापीठाच्या दहा विद्याशाखांमध्ये वैद्यकीय विज्ञान, दंतवैद्यक, आयुर्वेद, फिजिओथेरपी, नर्सिंग, संलग्न आरोग्य विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी आणि संलग्न विज्ञान या विषयांचा समावेश आहे. विद्यापीठांतर्गत जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज (जेएनएमसी), दत्ता मेघे मेडिकल कॉलेज (डीएमएमसी), शरद पवार डेंटल कॉलेज (एसपीडीसी), महात्मा गांधी आयुर्वेद कॉलेज अँड रिसर्च सेंटर (एमजीएसी अँड आरसी), रवी नायर फिजिओथेरपी कॉलेज (आरएनपीसी), श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग (एसआरएमएमसीओएन), स्कूल ऑफ अलाइड हेल्थ सायन्सेस (एसएएचएस), दत्ता मेघे कॉलेज ऑफ फार्मसी (डीएमसीपी), फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (एफईएटी) आणि स्कूल ऑफ अलाइड सायन्सेस (एसएएस) या संस्थांचा समावेश आहे.

या समारंभाला महाराष्ट्र शासनाचे राज्यमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच विद्यापीठाचे खजिनदार डॉ. मलय महादेविया, विश्वस्त श्री. सागर मेघे आणि कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांचीही उपस्थिती होती. १०० वैद्यकीय विद्यार्थ्यांपासून १४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंतचा प्रवास वर्ध्यातील सावंगी मेघे येथे, नागपूरपासून सुमारे ८० किलोमीटर अंतरावर असलेले अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च हे बहुविद्याशाखीय अभिमत विद्यापीठ आहे. 'लर्न अँड लीड' (शिका आणि नेतृत्व करा) हे ध्येय समोर ठेवून विद्यापीठ विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण आणि यशस्वी कारकीर्द घडविण्यासाठी तयार करते. तसेच व्यावसायिक क्षेत्रातील यशाच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करते. केवळ १०० वैद्यकीय विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या संस्थेचा आज १४,००० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत विस्तार झाला आहे. विद्यापीठात २६० हून अधिक बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. आरोग्य विज्ञानासह विविध विषयांतील शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि समाजाभिमुख उपक्रमांवर विद्यापीठाचा विशेष भर आहे.

शहराच्या गजबजाटापासून दूर असलेला विद्यापीठाचा विस्तीर्ण, हिरवागार आणि शांत परिसर स्वयंपूर्ण संकुल म्हणून विकसित करण्यात आला आहे. देशातील प्रमुख शहरांशी हे विद्यापीठ रस्ते आणि रेल्वे मार्गांनी जोडलेले असून, हवाई प्रवासासाठी नागपूर विमानतळाची सुविधा उपलब्ध आहे. २०१९ मध्ये विद्यापीठाने महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे आपले पहिले बाह्य महाविद्यालय सुरू केले. विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेकडून (नॅक) -++ मानांकन प्राप्त झाले आहे. नॅक ही विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्थापन केलेली स्वायत्त संस्था असून, भारतातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन आणि मानांकन करण्याचे कार्य करते.

अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चविषयी अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (एआयएचईआर) हे वर्ध्यातील सावंगी मेघे येथे स्थित बहुविद्याशाखीय अभिमत विद्यापीठ आहे. यापूर्वी ही संस्था दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च या नावाने ओळखली जात होती. नागपूरपासून सुमारे ८० किलोमीटर अंतरावर असलेले हे विद्यापीठ उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी पोषक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देते. 'लर्न अँड लीड' या ध्येयाने प्रेरित असलेले विद्यापीठ विद्यार्थ्यांना उज्ज्वल, अर्थपूर्ण आणि समाजोपयोगी भविष्य घडविण्यासाठी सक्षम करण्यावर भर देते. व्यावसायिक क्षेत्रातील यशाच्या माध्यमातून समाजाच्या विकासात योगदान देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. १०० वैद्यकीय विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या संस्थेत आज १४,००० हून अधिक विद्यार्थी २६० हून अधिक बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत आहेत. निसर्गरम्य आणि शांत परिसरात वसलेले हे स्वयंपूर्ण संकुल रस्ते, रेल्वे आणि नागपूरमार्गे हवाई वाहतुकीने देशातील प्रमुख शहरांशी जोडलेले आहे. २०१९ मध्ये विद्यापीठाने नागपूर येथे आपले पहिले बाह्य महाविद्यालय सुरू केले.

## महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी स्मृती वर्षानिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा



**प्रतिनिधी/दै.जन-संग्राम**

**वर्धा :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२६-२७ हे वर्ष महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी स्मृती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्याअनुषंगाने समाज कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबतच सामाजिक जाणीव-जागृती व सांस्कृतिक विकास व्हावा या उद्देशाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मनोज पाते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) अमोल भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) ज्ञानदा फणसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) मनीषा कुरसंगे, कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार याची उपस्थिती होती.

जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग अंतर्गत कार्यरत एकूण २९ अनुदानित वसतिगृहातील शालेयस्तर इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या सिंधुताई सपकाळ सभागृहात 'महाड सत्याग्रह: सामाजिक क्रांतीची नांदी' या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परीक्षण केसरीमल कन्या विद्यालयाच्या सहाय्यक शिक्षिका योगेश्वरी वानखडे, पल्लवी वखरे आणि समाजभूषण पुरस्कारप्राप्त सेवानिवृत्त शिक्षक राजू थूल यांनी केले.

स्पर्धेतील विजेत्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्याहस्ते प्रथम पुरस्कार ३ हजार रुपये, द्वितीय २ हजार रुपये व तृतीय पुरस्कार १ हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. यावेळी पराग सोमण यांनी महाड चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व पटवून दिले आणि विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकास कसा साधावा याबाबत स्वअनुभवातून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला अनुदानित वसतिगृहांचे अधीक्षक तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांच्या नेतृत्वात समाज कल्याण विभागाद्वारे करण्यात आले, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

## गरबा संमिश्र भारतीय सांस्कृतिकचे प्रतिक- डॉ संदिप काळे



**प्रतिनिधी/दै.जन-संग्राम**

**सेलू :** यशवंत महाविद्यालय सेलू येथे सांस्कृतिक विभाग अंतर्गत गरबा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तमरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप काळे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा. अमित चीनेवार, पर्यवेक्षक प्रा. सुनील धनुले, परीक्षक प्रमुख म्हणून डॉ. जयश्री देशमुख, प्रा. अर्चना बारंगे, प्रा. सोनाली पावडे, प्रा. ममता राउत यांनी काम पाहिले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत गरबा व दांडिया नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. रंगीबेरंगी पोशाख, आकर्षक नृत्याविष्कार आणि संगीताच्या तालावर नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे कार्यक्रमात विशेष रंगत निर्माण झाली. विद्यार्थी आपल्या नृत्य कौशल्यातून भारतीय संस्कृती आणि परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. स्पर्धे मुळे विद्यार्थानमधील कलागुणांचा वाव मिळाला तसेच सांघिक भावना, आत्मविश्वास आणि संस्कृतिक जाणीव वाढीस लागण्यास मदत झाली आणि कला सादर करण्याची संधी मिळाली. गरबा स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे परीक्षण परीक्षकांनी नृत्यकौशल्य, तालबद्धता, वेशभूषा आणि सादरीकरण या निकषांवर केले. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांनी कौतुक करत प्रथम तीन क्रमांक आणि प्रोत्साहन पर नंबर प्रदान करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्यांनी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांच्यात एकोपा व आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथींनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अर्चना डाहाणे, आभार कनिष्ठ महाविद्यालाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. स्मिता तेलरांधे, आणि संचालन कु अक्षरा भगत यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभाग, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गरबा स्पर्धा आनंददायी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## पदवीधर मतदारांची नाव शोधण्यासाठी धावपळ

**प्रतिनिधी/दै.जन-संग्राम**

**वर्धा :** पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची तयारी सुरू असताना मतदार यादीत आपले नाव शोधण्यासाठी पदवीधरांची धावपळ सुरू झाली आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या कार्यालयातून मतदारांना सतत दूरध्वनी येत असल्याने अनेकांनी मतदार यादीत आपल्या नावाचा शोध घेण्यास सुरुवात केली. पूर्वी मतदार यादीत नाव असतानाही नव्या यादीत ते आढळत नसल्याने अनेक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

पूर्वीच्या मतदार यादीत नोंद असलेल्या अनेक पदवीधरांची नावे नव्या मतदार यादीत दिसून येत नसल्याचे समोर येत आहे. निवडणुकीचा काळ जवळ येत असल्याने विविध उमेदवारांच्या कार्यालयातून पदवीधर मतदारांना दूरध्वनी केले जात आहेत. या दूरध्वनींमुळे अनेकांनी आपले नाव, मतदार क्रमांक आणि मतदान केंद्राची माहिती तपासण्यास सुरुवात केली आहे. काही मतदारांनी दूरध्वनी करणाऱ्या प्रतिनिधींकडे आपल्या नावाची तसेच मतदार क्रमांक आणि मतदान केंद्राची माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी केली. संबंधित प्रतिनिधींनी काही वेळात संपूर्ण माहिती मिळेल, असे सांगितले. मतदार यादीत नावच आढळत नसल्याने संबंधित मतदारांना आवश्यक माहिती मिळू शकली नाही. हा प्रकार केवळ एका मतदारापुरता मर्यादित नसून, अनेक पदवीधरांना अशाच समस्येचा सामना करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी पदवीधरांची धावपळ सुरू झाली आहे.